# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## मुक्त अध्ययन प्रशाळा

**शैक्षणिक वर्ष २०२०-२१ – प्रथम वर्ष वाणिज्य प्रवेश – नेहमी विचारले जाणारे प्रश्न**

**१) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात बहि:स्थ किंवा दूरस्थ शिक्षण (ODL) पद्धतीने प्रथम वर्ष वाणिज्य (एफ.वाय.बी.कॉम.) या वर्गात प्रवेश घेता येईल का?**

उ. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मुक्त अध्ययन प्रशाळेद्वारे **दूरस्थ शिक्षण पद्धतीने** प्रथम वर्ष वाणिज्य एफ.वाय.बी.कॉम. या वर्गात प्रवेश घेता येईल.

**२) प्रथम वर्ष वाणिज्य प्रवेशासाठी पात्रता निकष काय आहेत?**

उ. प्रथम वर्ष वाणिज्य प्रवेशासाठी खालीलपैकी कोणतीही एक पात्रता आवश्यक आहे:

i) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ किंवा समकक्ष मंडळ यांची उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इयत्ता १२वी) इंग्लिश विषयासह उत्तीर्ण (नियमित किंवा खाजगी विद्यार्थी)

ii) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ यांची उच्च माध्यमिक व्यावसायिक प्रमाणपत्र परीक्षा (एच.एस.सी. व्होकेशनल) उत्तीर्ण.

iii). माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (इयत्ता १०वी) नंतर महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ किंवा समकक्ष मंडळ यांचा 3 वर्षांचा पदविका शिक्षणक्रम पूर्ण.

iv) माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (इयत्ता १०वी) नंतर औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आय.टी.आय.) येथून यांचा किमान 2 वर्षांचा व्यवसाय प्रमाणपत्र / पदविका शिक्षणक्रम पूर्ण.

**३) प्रथम वर्ष वाणिज्य प्रवेशासाठी कोणकोणते विषय उपलब्ध आहेत?**

उ. प्रथम वर्ष वाणिज्य प्रवेशासाठी उपलब्ध विषयांमधून एकूण सहा विषय निवडायचे आहेत:

**अनिवार्य विषय:**

1. Compulsory English
2. Financial Accounting
3. Business Economics

**खालीलपैकी कोणताही १ विषय:**

1. Organization Skill Development
2. Banking and Finance

3. Commercial Geography
4. Defence Organization & Management in India
5. Theory and Practice of Cooperation
6. Managerial Economics

खालीलपैकी कोणताही १ विषय:

1. Essentials of E-Commerce
2. Insurance and Transport
3. Marketing and Salesmanship
4. Consumer Protection and Business Ethics
5. Business Environment & Entrepreneurship
6. Foundation Course in Commerce

खालीलपैकी कोणताही १ विषय:

1. Additional English
2. Marathi
3. Hindi

खालीलपैकी कोणताही १ विषय:

1. Business Mathematics & Statistics
2. Computer Concepts and Application

**४) नियमित महाविद्यालयातील विद्यार्थी आणि दूरस्थ शिक्षण पद्धतीतील अभ्यासक्रम (syllabus) हे वेगवेगळे आहेत का?**

उ. नाही, नियमित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना विद्यापीठ मान्यताप्राप्त जो अभ्यासक्रम (syllabus) लागू आहे तोच अभ्यासक्रम दूरस्थ शिक्षण पद्धतीतील विद्यार्थ्यांनादेखील लागू आहे. सदर अभ्यासक्रम मुक्त अध्ययन प्रशाळेच्या http://www.unipune.ac.in/sol/ या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**५) प्रथम वर्ष वाणिज्य वर्गाकरिता कोणत्या माध्यमातून प्रवेश उपलब्ध आहेत?**

उ. प्रथम वर्ष वाणिज्य वर्गाकरिता मराठी तसेच इंग्लिश माध्यमातून प्रवेश उपलब्ध आहेत.
तथापि, अभ्यास साहित्याचे माध्यम पुढीलप्रमाणे असेल:

| विषय | अभ्यास साहित्याचे माध्यम |
| --- | --- |
| Financial Accounting, Business Mathematics & Statistics, Essentials of E-Commerce, Compulsory English, Additional English | इंग्लिश |
| मराठी | मराठी |
| हिंदी | हिंदी |
| Business Economics, Computer Concepts and Application, Organization Skill Development, Banking and Finance, Defence Organization & Management in India, Theory and Practice of Cooperation, Managerial Economics, Insurance and Transport, Marketing and Salesmanship, Consumer Protection and Business Ethics, Business Environment & Entrepreneurship, Foundation Course in Commerce, Commercial Geography | मराठी किंवा इंग्लिश (विद्यार्थ्याने निवडलेल्या माध्यमानुसार) |

**६) मुक्त अध्ययन प्रशाळेतील प्रवेश हे प्रवेश परीक्षा किंवा गुणवत्ता यादीद्वारे होतील का?**

उ. प्रवेशासाठी कोणतीही प्रवेश परीक्षा अथवा गुणवत्ता यादी असणार नाही. “प्रथम येणाऱ्यास प्राधान्य” या तत्वावर उपलब्ध मर्यादित जागांसाठी प्रवेश दिले जातील.

**७) प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी विद्यापीठामध्ये मुक्त अध्ययन प्रशाळेमध्ये जाणे आवश्यक आहे का?**

उ. नाही, प्रवेश प्रक्रिया ही ऑनलाईन पद्धतीने होणार असल्याने त्यासाठी प्रशाळेमध्ये जाणे आवश्यक नाही.

**८) विद्यार्थ्यास कोणत्या महाविद्यालयात प्रवेश घेता येईल?**

उ. पुणे, अहमदनगर, नाशिक आणि सिल्वासा जिल्ह्यातील सावित्रीबाई फुले विद्यापीठाशी संलग्नित काही महाविद्यालयांमध्ये मुक्त अध्ययन प्रशाळेने दूरस्थ शिक्षण विद्यार्थ्यांकरिता अभ्यासकेंद्र सुरु केलेली आहेत. त्यातील उपलब्ध महाविद्यालयामधून एक महाविद्यालय विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेवेळी निवडायचे आहे.

**९) शैक्षणिक वर्ष २०२०-२१ च्या प्रवेशाकरिता ऑनलाईन नावनोंदणी कोणत्या संकेतस्थळावर आहे?**

उ. शैक्षणिक वर्ष २०२०-२१ च्या प्रवेशाकरिता ऑनलाईन नावनोंदणी मुक्त अध्ययन प्रशाळेच्या http://www.unipune.ac.in/sol/ या संकेतस्थळावर आहे.

**१०) प्रवेशासाठी कोणती कागदपत्रे आवश्यक आहेत?**

उ. ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेदरम्यान अपलोड करण्यासाठी विद्यार्थ्यांच्या खालील कागदपत्रांच्या स्कॅन केलेल्या प्रती आवश्यक आहेत:

१. पासपोर्ट आकाराचा फोटो

२. सही

३. पात्र परीक्षेचे गुणपत्रक (१२वी / पदविका / व्यवसाय प्रमाणपत्र)

४. नावात बदल असल्यास त्यासंदर्भात कागदपत्र

(विद्यार्थ्यांच्या मागील गुणपत्रकावरील नाव ग्राह्य धरण्यात येईल. त्या नावात बदल झाला असल्यास त्यासंदर्भातील कागदपत्र अपलोड करणे आवश्यक)

याव्यतिरिक्त, प्रवेश अर्ज अभ्यास केंद्रावर जमा करतेवेळी स्थानांतर / स्थलांतर प्रमाणपत्र आवश्यक राहील.

**११) प्रवेश अर्ज ऑनलाईन पद्धतीने भरल्यावर अभ्यास केंद्रावर कागदपत्रे कोणत्या मुदतीत जमा करणे आवश्यक आहे?**

उ. ऑनलाईन पद्धतीने भरलेल्या प्रवेश अर्जाची व शुल्काची प्रिंट तसेच प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रे ही विद्यार्थ्यांनी निवडलेल्या अभ्यास केंद्रावर जमा करणे आवश्यक आहे.

तथापि, कोविड-१९ महामारीच्या पार्श्वभूमीवर असलेल्या लॉकडाउनमुळे सद्य स्थितीत प्रवेश अर्ज अभ्यास केंद्रावर जमा करू नयेत. अभ्यास केंद्रावर प्रवेश अर्ज जमा करण्याबाबत सविस्तर सूचना प्रशाळेच्या http://www.unipune.ac.in/sol/ या संकेतस्थळावर प्रदर्शित केली जाईल. त्यानुसार विद्यार्थांना प्रवेश अर्ज अभ्यास केंद्रावर जमा करणे बंधनकारक राहील.

**१२) प्रवेशासाठी काय आवश्यक आहे – स्थानांतर प्रमाणपत्र (TC/LC) की स्थलांतर प्रमाणपत्र (Migration Certificate)?**

उ. विद्यार्थ्यास स्थानांतर आणि स्थलांतर प्रमाणपत्र या दोन्हीपैकी आवश्यक एक प्रमाणपत्र जमा करणे बंधनकारक आहे.

**स्थानांतर प्रमाणपत्र (शाळा/महाविद्यालय सोडल्याचा दाखला) पुढील विद्यार्थ्यांसाठी आवश्यक आहे:**

जे विद्यार्थी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातून १२वीची परीक्षा नियमित विद्यार्थी म्हणून उत्तीर्ण झाले आहेत त्यांनी स्थानांतर प्रमाणपत्र (शाळा/महाविद्यालय सोडल्याचा दाखला) जमा करणे आवश्यक आहे.

**स्थलांतर प्रमाणपत्र (Migration Certificate) पुढील विद्यार्थ्यांसाठी आवश्यक आहे:**

स्थलांतर प्रमाणपत्र (Migration Certificate) पुढील विद्यार्थ्यांसाठी आवश्यक आहे:

अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातून १२वीची परीक्षा बहि:स्थ/खाजगी विद्यार्थी म्हणून उत्तीर्ण झालेले विद्यार्थी.

ब) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाव्यतिरिक्त इतर शिक्षण मंडळातून उच्च माध्यमिक प्रमाणपत्र / पदविका / व्यवसाय प्रमाणपत्र प्राप्त परीक्षा उत्तीर्ण झालेले विद्यार्थी जसे की

1. महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ
2. महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ
3. राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद
4. राष्ट्रीय मुक्त विद्यालयीन शिक्षण संस्था (एन.आय.ओ.एस.)
5. केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ (सी.बी.एस.ई.)
6. काउन्सिल ऑफ इंडियन स्कूल सर्टिफिकेट एक्झॅमिनेशन (सी.आय.एस.सी.ई.)
7. अन्य राज्यातील शिक्षण मंडळ
8. आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळ जसे की केंब्रिज असेसमेंट इंटरनॅशनल एज्युकेशन (सी.ए.आय.ई.), इंटरनॅशनल बॅकलॉरिएट (आय.बी.) इ.

वरील शिक्षण मंडळांमधून परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या शिक्षण मंडळाकडून स्थलांतर प्रमाणपत्र (Migration Certificate) घेऊन मुक्त अध्ययन प्रशाळेकडे जमा करणे आवश्यक आहे.

**१३) मी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातून खाजगी विद्यार्थी म्हणून १२वीची परीक्षा उत्तीर्ण आहे. मला शाळा/महाविद्यालयाकडून मिळालेल्या स्थानांतर (Transfer Certificate) प्रमाणपत्रावर प्रथम वर्ष बी.कॉम. या वर्गामध्ये प्रवेश मिळेल का?**

उ. नाही, अशा विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून स्थलांतर प्रमाणपत्र (Migration Certificate) घेऊन मुक्त अध्ययन प्रशाळेकडे जमा करणे आवश्यक आहे.

**१४) ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेवेळी अपलोड करण्यासाठी छापील गुणपत्रिका मला अद्याप मिळालेली नाही. मी ऑनलाईन प्रवेश घेऊ शकतो का?**

उ. होय, प्रवेश प्रक्रियेवेळी ऑनलाईन गुणपत्रिकेची प्रत अपलोड करून प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज करता येईल.

**१५) ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेवेळी अपलोड करण्यासाठी स्थानांतर / स्थलांतर प्रमाणपत्र (Transfer / Migration Certificate) अद्याप मला मिळालेले नाही. मी ऑनलाईन प्रवेश घेऊ शकतो का?**

उ. होय, स्थानांतर / स्थलांतर प्रमाणपत्र मिळाले नसले तरी प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज करता येईल. तथापि, सदर प्रमाणपत्र विहित मुदतीत मुक्त अध्ययन प्रशाळेकडे जमा करणे विद्यार्थ्यावर बंधनकारक राहील. अन्यथा अशा विद्यार्थ्यांचा प्रवेश निश्चित होणार नाही.

**१६) प्रथम वर्ष वाणिज्य प्रवेशासाठी शुल्क रचना काय आहे? शुल्क भरणा कोणत्या पद्धतीने करायचा आहे?**

उ. प्रथम वर्ष वाणिज्य प्रवेशासाठी शुल्क पुढीलप्रमाणे आहे:

अ) महाराष्ट्रातील शिक्षण मंडळांमधून उत्तीर्ण झालेले विद्यार्थी जसे की

1. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
2. महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ
3. महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ

यांना प्रथम वर्षाकरिता शुल्क **₹ ५२००/-** आहे.

ब) महाराष्ट्राबाहेरील शिक्षण मंडळांमधून उत्तीर्ण झालेले विद्यार्थी जसे की

1. राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद
2. राष्ट्रीय मुक्त विद्यालयीन शिक्षण संस्था (एन.आय.ओ.एस.)
3. केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ (सी.बी.एस.ई.)
4. काउन्सिल ऑफ इंडियन स्कूल सर्टिफिकेट एक्झॅमिनेशन (सी.आय.एस.सी.ई.)
5. अन्य राज्यातील शिक्षण मंडळ
6. आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळ जसे की केंब्रिज असेसमेंट इंटरनॅशनल एज्युकेशन (सी.ए.आय.ई.), इंटरनॅशनल बॅकलॉरिएट (आय.बी.) इ.

यांना प्रथम वर्षाकरिता शुल्क **₹ ५९००/-** आहे.

प्रवेश प्रक्रियेवेळी सदर शुल्क भरणा फक्त ऑनलाईन पद्धतीने (नेट बँकिंग / क्रेडीट/डेबिट कार्ड) करता येईल.

**१७) प्रवेशासाठी पात्र परीक्षा २०२० पूर्वी उत्तीर्ण असल्यास शिक्षणखंड प्रमाणपत्र (गॅप सर्टिफिकेट) आवश्यक आहे का? प्रवेशासाठी वयोमर्यादा आहे का?**

उ. प्रवेशासाठी शिक्षणखंड प्रमाणपत्र (गॅप सर्टिफिकेट) आवश्यक नाही. तसेच, प्रवेशासाठी कोणतीही वयोमर्यादा नाही.

**१८) मी यापूर्वी इतर महाविद्यालयात किंवा इतर विद्यापीठात प्रवेश घेतला होता. आता मुक्त अध्ययन प्रशाळेत प्रथम वर्ष बी.कॉम. प्रवेशासाठी स्थानांतर प्रमाणपत्र / स्थलांतर प्रमाणपत्र आवश्यक आहे का?**

उ. यापूर्वी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयात प्रवेश घेतला असल्यास त्या महाविद्यालयाने दिलेले स्थानांतर प्रमाणपत्र (Transfer Certificate) हे मुक्त अध्ययन प्रशाळेत प्रवेशासाठी आवश्यक राहील.

यापूर्वी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाव्यतिरिक्त इतर विद्यापीठात प्रवेश घेतला असल्यास त्या विद्यापीठाने दिलेले स्थलांतर प्रमाणपत्र (Migration Certificate) हे मुक्त अध्ययन प्रशाळेत प्रवेशासाठी आवश्यक राहील.

**१९) ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेवेळी काही समस्या आल्यास मुक्त अध्ययन प्रशाळेकडे संपर्क कसा साधावा?**

उ. मुक्त अध्ययन प्रशाळेचे कार्यालय **"तळमजला, I.D.S. इमारत, सेट गेस्ट हाउसजवळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ"** येथे आहे. परंतु सद्य लॉकडाऊन परिस्थितीत विद्यार्थ्यांच्या सोयीकरिता खालील इ-मेल आय.डी. व मोबाईल क्रमांक उपलब्ध करून देण्यात आले आहेत:

मोबाईल क्र. 8275425972 (कार्यालयीन वेळेत)

इ-मेल आय.डी.: admission.sol@unipune.ac.in

ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेवेळी काही समस्या आल्यास विद्यार्थ्यांना वरील इ-मेलवर / मोबाईलवर संपर्क साधता येईल.

**२०) विद्यार्थ्यांसाठी प्रशाळेद्वारे मार्गदर्शनपर व्याख्याने आयोजित केली जातात काय?**

उ. प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी ओळख (उद्बोधन) कार्यक्रम तसेच विद्यार्थ्यांना स्वयं-अध्ययनासाठी तसेच त्यांच्या अभ्यासामधील शंका निरसन करण्यासाठी प्रत्येक विषयाची मार्गदर्शनपर संमंत्रण सत्रे (counselling sessions) आयोजित केली जातात.

**२१) प्रशाळेतर्फे विद्यार्थ्यांना पुस्तके मिळतील का?**

उ. विद्यापीठ अनुदान आयोग (UGC) मान्यताप्राप्त निकषांनुसार स्वयं-अध्ययन साहित्य सर्व प्रवेशित विद्यार्थ्यांना मिळेल. विद्यापीठाच्या सुधारित अभ्यासक्रमानुसार सर्व विषयांची पुस्तके विद्यार्थ्यांना मिळतील. तसेच संदर्भासाठी देखील अभ्यास साहित्य हे डिजिटल स्वरुपात उपलब्ध असेल.

**२२) परीक्षा पद्धती कोणती आहे – वार्षिक की सत्रांत?**

उ. परीक्षा पद्धती ही वार्षिक आहे. शैक्षणिक वर्षाच्या शेवटी परीक्षा घेतली जाईल. तसेच प्रशाळेद्वारे घेण्यात येणाऱ्या अंतर्गत मूल्यमापनासाठी काही गुण राखीव असतील.

**२३) दूरस्थ शिक्षण विद्यार्थ्यांकरिता परीक्षा केंद्र कोणते असेल?**

उ. दूरस्थ शिक्षण विद्यार्थ्यांची परीक्षा ही मुक्त अध्ययन प्रशाळेच्या अभ्यासकेंद्रावर होईल.